# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
# दिनांक 14/12/2019 (शनिवार)
# (सकाळ)

---

## अपघातात मृत्यु

पो.स्टे. कळमेश्वर :– अंतर्गत 12 कि.मी. अंतरावरील मौजा 14 मैल नागपुर ते अमरावती हायवे रोड एचपी पेट्रोल पंप समोर येथे दिनांक 13/12/2019 चे 19:30 वा. दरम्यान वसंतराव वामनराव इंगोले, वय 52 वर्ष, रा. भारसिंगी, ता. नरखेड हे पायदळ रोड क्रॉस करीत होते. दरम्यान नागपूरकडून अमरावती मार्गाने जात असलेल्या एमएच–09/ईएम–2260 क्रमांकाच्या शिवशाही एसटी बसचा चालक आरोपी नामे– अजय भाऊराव सहारे, वय 47 वर्ष, रा. यशोदा, जि. अमरावती याने त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन वसंतराव इंगोले यांना धडक दिली. या अपघातात वसंतराव इंगोले हे बसच्या मागच्या उजव्या भागाचे टायर खाली येवुन गंभीर जखमी होउन त्यांचा जागीच मृत्यू झाला.

सदर प्रकरणी सर तर्फे पो. ना. माणिक शेख यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 337, 338, 304 (अ) भादंवी. कायद्यान्वये गुन्हा नोंद करून आरोपीस अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक श्री. कर्मलवार (9021452760) हे करीत आहे.

## शासकीय कामकाजात अळथळा निर्माण करणाऱ्या आरोपी विरूद्ध गुन्हा नोंद

पो.स्टे. भिवापुर :– अंतर्गत 05 कि.मी अंतरावर हिवराहिवरी, रामटेक येथे दिनांक 19/06/2017 चे 13.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– शंकर विठठलराव खुजनाके, वय 56 वर्ष हे तहसील कार्यालय येथे तलाठी या पदावर कार्यरत असून फिर्यादींच्या कार्यालयात आरोपी नामे– अजाब संपत राउत, वय 60 वर्ष, रा. वासी हा आला. यानंतर फिर्यादीला आरोपीने म्हटले की, 'सन 1996 ते 1998 मध्ये माझे वडीलोपार्जीत शेतीचे फेरफार माझ्या भावाचे नावाने कसे केले. तसेच आरोपीने फिर्यादीला शिविगाळ करून त्यांना मारहाण करून जिवे मारण्याची धमकी दिली. तसेच आरोपीने कागदपत्राचे फेक फाक करून शासकीय कामात अडथळा निर्माण केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. भिवापुर येथे आरोपी विरुध्द कलम 353, 332, 504, 506 भादंवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास सफौ भस्मे हे करीत आहे.

# दुखापत

पो.स्टे. मौदा :– अंतर्गत 1 कि.मी अंतरावर आठवडी बाजार मौदा येथे दिनांक 13/12/2019 चे 20:45 वा. दरम्यान फिर्यादी नामे– सलमान अरमान शेख, रा. आदर्श चौक, मौदा हा बॅटरी व लोखंडी एलईडी लाईट किरायने आठवडी बाजार वाल्यांना देत असतो. आरोपी क्र. 1) आशिष मेहर, रा. मौदा याला फिर्यादीने बॅटरी किरायाने दीली असता सदर बॅटरी ते मागायला गेले. दरम्यान आरोपी क्र. 1) व आरोपी क्र. 2) रोहीत साठवने, आरोपी क्र. 3) स्वप्नील साठवने आशिस मेहर व त्याचे वडिल आरोपी क्र. 4) अशोक मेहर यांनी संगणमत करून फिर्यादीस शिविगाळ केली. तसेच आरोपीतांनी फिर्यादीला हातबुक्कीने व लोखंडी सळाखीने मारहाण करून दुखापत केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम 324, 504, 506, 34 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. यातील आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास परि पोलिस हवालदार कुथे हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर